# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी -- 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/ ९४६
दिनांक : 25 JUL 2018

विषय : शासकीय,शासन अनुदानीत संस्थां, विद्यापीठ संचालित महाविद्यालये/विभाग यामध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेशासाठी अतिरिक्त प्रवेश फेरीबाबत.....

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या ३ प्रवेश फे-या आयोजित करण्यात येतात. या ३ केंद्रीभूत प्रवेश फे-यांनंतर रिक्त राहिलेल्या जागा संस्थास्तरावर भरण्याची तरतूद आहे. राज्यातील शासकीय,शासन अनुदानीत संस्थां, विद्यापीठ संचालित महाविद्यालये/विभाग यामध्ये रिक्त राहिलेल्या जागा विद्यार्थ्यांच्या हितार्थ एकत्रितपणे आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत अतिरिक्त प्रवेश फेरी आयोजित करून त्यामार्फत करण्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.३८१(ब)/तांशि-४, दिनांक २१.७.२०१६ अन्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर शासकीय,शासन अनुदानीत संस्थां, विद्यापीठ संचालित महाविद्यालये/विभाग यामध्ये रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेशासाठीच्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक अभ्यासक्रमनिहाय प्रवेश सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेले आहे.याबाबत खालील सूचना स्पष्ट करण्यात येत आहेत.

१. शासनमान्य प्रवेश नियमावलीनुसार या अतिरिक्त प्रवेश फेरींसाठी **अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट असलेले** उमेदवार पात्र असतील.
२. या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग व विद्यापीठ संचलित संस्थांतील रिक्त जागांची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
३. अतिरिक्त फेरीमध्ये भाग घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने विकल्प अर्ज भरणे आवश्यक आहे.
४. अतिरिक्त फेरीमध्ये जागेचे वाटप झाल्यास अशा उमेदवारांच्या त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग व विद्यापीठ संचलित संस्थांतील प्रवेश आपोआप रद्द होईल व अशा रद्द झालेल्या जागेवर उमेदवाराचा कोणत्याही प्रकारे हक्क असणार नाही.
५. अतिरिक्त फेरीमध्ये जागेचे वाटप झालेल्या उमेदवारास त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला प्रवेश विनाअनुदानीत संस्थेतील असेल तर विनाअनुदानीत संस्थेतील प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही उमेदवाराने स्वत: करणे आवश्यक आहे.

६. अतिरिक्त फेरीमध्ये प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी विहीत मुदतीमध्ये जागेचे वाटप झालेल्या संस्थेमध्ये प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.अन्यथा सदरच्या जागेवर उमेदवार प्रवेशास पात्र असणार नाही.

वरील सूचनांची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

आपला,

( डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई